# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**९७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि०३.०२.२०२३**

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (२७/०१/२०२३ ते ०२/०२/२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०४/०२/२०२३ ते ०८/०२/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | दिनांक | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०.८ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २८.८ | २७.८ | ३१.२ | ३०.६ | २९.६ | २८.४ | २६.६ | कमाल तापमान (अंसे) | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ |
| १७.१ | १३.९ | १८.४ | १७.९ | १६.५ | १६.९ | १४.३ | किमान तापमान (अंसे) | ११ | ११ | १२ | १२ | १३ |
| २.० | ०.० | ०.० | २.० | ०.० | ०.० | ०.० | ढगस्थिती (आकाश) | १ | १ | ० | १ | २ |
| ९२ | ७९ | ५० | ९२ | ८८ | ८१ | ८३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ६९ | ६८ | ६७ | ६७ |
| ५२ | २६ | ३१ | ३६ | ४७ | ५० | ३६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४० | ३९ | ३५ | ३० | २९ |
| ०.९ | २.० | १.८ | १.७ | १.५ | १.९ | २.१ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९.६ | ९.२ | ८.४ | ९.४ | ८.९ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहील. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **हरभरा:** घाटे अळीच्या नर पतंगांना आकर्षित करण्यासाठी पिकात एकरी १० कामगंध सापळे लावावेत. |
| हरभरा | घाटे भरण्याची अवस्था | घाटे अळीच्या नर पतंगांना आकर्षित करण्यासाठी पिकात एकरी १० कामगंध सापळे लावावेत. तसेच या अळीच्या नैसर्गिक नियंत्रणासाठी शेतात एकरी ४० पक्षी थांबे लावावेत. त्याचप्रमाणे २० ग्रॅम बॅसिलस थुरिंगिएन्सिस किंवा ४० ग्रॅम ब्युवेरिया बेसियाना पावडर १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | | पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायफेन्थियुरॉन ४७.८ एससी १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. |
| कोथिंबीर | | मावा, फुलकिडे आणि तु डतुड्यांच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क किंवा ५० मिली निंबोळी तेल किंवा १५ ग्रॅम एसीफेट ७५ एसपी १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. |
| लिंबू वर्गीय पिके | | सायला आणि फुलकीड्यांच्या नियंत्रणासाठी ४ ग्रॅम थायमेथोक्सॅम २५ डब्ल्यूजी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फळझाडांवर फवारणी करावी. |
| कांदा | पीक वाढीची अवस्था | कांदा पिकावरील फुल किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% प्रवाही १५ मिली किंवा लॅ म्बडा सायहॅलोथ्रीन ५% प्रवाही ६ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पा ण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरण्याची अवस्था | लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी १.५% क्विनॉलफॉस भुकटी किंवा ५% मेलॅथिऑन भुकटी २० किलो प्रति एकरी याप्रमाणात सकाळी वारा शांत असताना धुरळावी. |
| भुईमुग (उन्हाळी) | पेरणीपुर्व तयारी | उन्हाळी भुईमूगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी.<br>पेरणीसाठी एसबी ११ , टीअेजी २४, फुले उनप , फुले उन्नती, टीजी २६, जेएल ५०१ या वाणांपैकी निवड करावी. |
| गहू | फुलोर्याची अवस्था | मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्लू.जी. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मका | कणसे सुटताना | पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव पुन्हा दिसून आल्यास इमामेक्टीन बेन्झोएट ०.४ मिली प्रति लिटर पाण्यातून फवारावे. अळीचा प्रादुर्भाव लक्ष्यात येण्यासाठी प्रति एकरी चार कामगंध सापळे लावावेत. |
| करडई | दाणे भरण्याची अवस्था | मावा किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| मोहरी | | माव्याच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३० ईसी किंवा १० ग्रॅम एॅसेफेट ७५ एसपी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. |
| सुरु ऊस | लागवड | सुरु उस लागवड १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण केल्यास उस उत्पादकता व साखरेचा उतारा चांगला मिळतो. आडसाली उस लागवडीसाठी को. ८६०३२ (नीरा) किंवा को.एम.०२६५ (फुले २६५) या जातींची निवड करावी. एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची) ऊस लागवड करावी त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. बेण्याद्वारे लागवड करावयाची असल्यास बेणे मळयात वाढवलेले ९ ते १० महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्ट्या शुद्ध ऊस बेणे वापरावे. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **पशुधन** | **जनावरांची हिवाळयात घ्यावयाची काळजी** | हा ऋतू आरोग्यदायक असला तरी लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे , जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टरपेंटाईनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट-पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अतिथंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळया-खुरकुज आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे. |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : ०३.०२.२०२३

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**